## In Short

### व्हॉट्सअ‍ॅपवरची लिंक पडली ४.९५ लाखांना!

■ ठाणे : लाईट बिल भरलेले नसल्याचे सांगून व्हॉट्सअ‍ॅपवर पाठविलेल्या लिंकवर अपडेट करा, असे सांगून एका महिलेला तब्बल ४ लाख ९५ हजार ४८९ रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तक्रारदार महिलेने सायबर क्राईम पोर्टलवर केलेल्या तक्रारीची दखल घेत बुधवारी नौपाडा पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संध्या दिनेश जोशी (५२) या खोपट येथे राहणाऱ्या महिलेला १९ मार्चला मोबाईलवर अज्ञात व्यक्तीचा फोन आला. आपण इलेक्ट्रीसिटी बोर्डातून बोलत असल्याचे सांगून, तुमच्या घराचे लाईट बिल अपडेट झालेले नसल्याने व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवलेल्या लिंकवर ते अपडेट करा, असे त्याने सांगितले. त्यानुसार महिलेने लिंक ओपन करून माहिती भरल्यावर तिच्या खात्यातून विविध ट्रान्झॅक्शनचे मेसेज येऊ लागले. तब्बल ४ लाख ९५ हजार ४८९ रुपये तिच्या खात्यातून गेले.

### दाऊदच्या भाच्याची सुटका

■ मुंबई : बांधकाम व्यावसायिकाकडून खंडणी वसुली केल्याच्या आरोपातून अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा भाचा आणि अन्य दोघांची सुटका करण्यात आली. या तिघांविरोधात २०१९ मध्ये मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. विशेष न्यायाधीश बी. डी. शेळके यांनी मोहम्मद रिझवान शेख इब्राहिम कासकर, अहमद राजा वधारिया आणि अशफाक यांना भादंवि ३८७, १२० आणि मोक्का आरोपातून मुक्त केले.

# बँकेतील वरिष्ठ लिपिकाची ५.४० लाखांना सायबर फसवणूक

■ मुंबई : फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून मैत्री करत गुंतवणुकीच्या माध्यमातून एका महिलेने बँकेत काम करणाऱ्या वरिष्ठ लिपिकाला ५ लाख ४० हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार माहीममध्ये समोर आला आहे. याप्रकरणी ऐश्वर्या शेट्टी नावाच्या महिलेविरोधात गुन्हा दाखल करून माहीम पोलीस अधिक तपास करीत आहेत.

माहीम मच्छीमार नगरमध्ये कुटुंबासोबत राहत असलेले ५१ वर्षीय तक्रारदार हे स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) मध्ये वरिष्ठ लिपिक पदावर नोकरी करतात. १३ मार्चला त्यांना ऐश्वर्या शेट्टी नावाच्या महिलेने फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. मागचा पुढचा विचार न करता तक्रारदार यांनी ती फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली. त्यानंतर ऐश्वर्याने फेसबुक मॅसेंजरच्या माध्यमातून तक्रारदार यांच्याशी गप्पा मारण्यास सुरुवात केली. काही दिवसांनी तिने तक्रारदार यांना यूएस डॉलर्समधील ट्रेडिंगबाबत (यूएसडीटी) माहिती सांगत यूएसडीटी प्लॅटफार्मवरून न्यू मल्टिगोल्ड कॅपिटल डी कंपनी यूएसमध्ये गोल्ड माईनिंग संदर्भात काम करत आहे, या कंपनीच्या माध्यमातून सोन्यामध्ये गुंतवणूक करून चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष तिने तक्रारदार यांना दाखवले. पुढे दोघांनी एकमेकांना आपले मोबाईल नंबर देत व्हॉट्सअ‍ॅप चॅटच्या माध्यमातून बोलणे सुरू झाले. यावेळी गुंतवणुकीसंदर्भात बोलणे सुरू असताना ऐश्वर्याने अचानक



३१ मार्चला व्हॉट्सअ‍ॅप बंद केले. चार दिवसांनी तिने पुन्हा अन्य एका नंबरवर व्हॉट्सअ‍ॅप सुरू करत तक्रारदार यांना एक लिंक पाठवून नोंदणी करण्यास सांगत सुरुवातीला ४० ते ५० हजार रुपयांची गुंतवणूक करण्यास सांगितले. तिच्या बोलाण्यावर विश्वास ठेऊन तक्रारदार यांनी ४० हजार रुपयांची गुंतवणूक केली. जी श्रीराम थेटर्स प्रा. लि. नावाने आयसीआयसी बँकेत असलेल्या खात्यावर घेण्यात आली होती. पुढे, तिने तक्रारदार यांना पाच लाख रुपये गुंतवण्यास सांगितले. तक्रारदार यांनी काहीही खातरजमा न करता पाच लाख रुपये गुंतवले. ही रक्कम पीएनबी बँकेतील एव्हरग्रीन कार रेन्टल नावाच्या खात्यावर घेण्यात आली होती. १० एप्रिलला तक्रारदार यांनी गुंतवणूक केलेली लिंक ओपन करण्याचा प्रयत्न केला, पण लिंक ओपन झाली नाही. ऐश्वर्यासुद्धा नॉटरिचेबल झाल्याने आपली फसवणूक झाल्याची तक्रारदार यांची खात्री पटली. अखेर त्यांनी माहीम पोलीस ठाणे गाठून ऐश्वर्या नावाच्या महिलेविरोधात ५ लाख ४० हजार रुपयांच्या आर्थिक फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# परीक्षेत कमी मार्क पडल्याने एमबीबीएस विद्यार्थ्याची गळफास घेवून आत्महत्या

■ मुंबई : परीक्षेत कमी मार्क पडल्याने आलेल्या नैराश्यातून वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या २२ वर्षीय तरुणाने राहत्या घरी ओढणीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना शुक्रवार, १२ एप्रिल रोजी कांदिवलीमध्ये घडली. अजय हडवंत जांगिड असे त्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चारकोप परिसरात असलेल्या अॅस्टर पॅलेस इमारतीमध्ये कुटुंबासोबत राहत असलेला अजय हा लातूरमधील विलासराव देशमुख मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षात शिकत होता. परीक्षेत कमी मार्क पडल्याने तो नैराश्यात होता. त्यामुळे गेली दोन महिने तो घरीच राहून नैराश्यावर उपचार घेत होता. याच नैराश्यातून त्याने सकाळी अकराच्या सुमारास राहत्या घराच्या हॉलमधील पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. कुटुंबीयांनी तातडीने त्याला उपचारासाठी शताब्दी रुग्णालयात नेले. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. डॉक्टरांनी अजयला दाखलपूर्व मृत घोषित केले.

## खारघरमध्ये अवघ्या काही मिनिटांत दोघांचे मोबाईल खेचले

■ नवी मुंबई : दुचाकीवरून येऊन मोबाईल स्नॅचिंग करणाऱ्या दोघा लुटारूंनी खारघर भागात अवघ्या काही मिनिटांमध्ये दोन तरुणांच्या हातातील महागडे मोबाईल फोन खेचून पलायन केल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील दोघा लुटारूंचा शोध सुरू केला आहे.

गैबिसाहब इब्राहिम बालगाव (२३) हा गुरुवारी सकाळी साडेसात वाजता खारघर सेक्टर-१४ मधील मशिदीबाहेरील रोडलगत येऊन उभा असता स्कूटीवरून आलेल्या लुटारूंनी त्याच्या हातातील मोबाईल फोन खेचून पलायन केले. त्यानंतर या लुटारूंनी काही अंतरावर असलेल्या स्मशानभूमीजवळ मोबाईलमध्ये यूट्यूबवर शॉर्ट व्हिडीओ बघत उभ्या असलेल्या तौसिब रमजान मुज्जावर (२४) याच्या हातातील ५० हजार रुपये किमतीचा आयफोन खेचून पळ काढला. यावेळी तौसिब याने सदर लुटारूंना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र ते स्कूटीवरून पसार झाले. त्यानंतर त्याने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या दोन्ही घटना अवघ्या काही मिनिटांमध्ये घडल्या.

# सायबर चोरट्याने महिला पोलिसाच्या खात्यातून काढले सव्वादोन लाख रुपये!

■ नवी मुंबई : मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या महिला पोलीस हवालदाराचे बँक खाते हॅक करून त्यांच्या खात्यातून सव्वा दोन लाख रुपयांची रक्कम अज्ञात सायबर चोरट्याने परस्पर दुसऱ्या खात्यामध्ये वळती करून फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. रबाळे पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी अ‍ॅक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.



या प्रकरणात फसवणूक झालेल्या महिला हवालदार ऐरोलीमध्ये राहण्यास असून, त्या मुंबई पोलीस दलात कार्यरत आहेत. या महिला पोलीस हवालदार गत मार्च महिन्यामध्ये सकाळी १० वाजण्याच्या सुमारास आपल्या कामावर जात असताना, अज्ञात सायबर चोरट्याने त्यांच्या बँक खात्यात असलेली सव्वा दोन लाख रुपयांची रक्कम परस्पर दुसऱ्या बँक खात्यात वळती करून घेतली. याबाबतचा मसेज महिला हवालदाराच्या मोबईलवर आल्यानंतर त्यांनी तत्काळ आपल्या बँकेत धाव घेऊन त्याबाबत चौकशी केली.

त्यांनतर अज्ञात व्यक्तीने त्यांचे बँक अकाऊंट हॅक करून त्यांच्या बँक खात्याला संलग्न असलेला ईमेल आयडी बदलून त्यांच्या खात्यातून सव्वा दोन लाख रुपये परस्पर आपल्या बँक खात्यात वळती करून घेतल्याचे बँकेच्या मॅनेजरने सांगितले. तसेच त्यांचे पैसे वडाळा पूर्व चांदनीनगर येथील अंकीत पाल या व्यक्तीच्या खात्यावर गेल्याची माहिती सुद्धा दिली. त्यानंतर या महिला पोलीस हवालदाराने सायबर पोर्टलवर व त्यानंतर रबाळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# क्राईम ब्रँचचे अधिकारी असल्याचे भासवून उकळले १२ लाख २१ हजार रुपये

■ नवी मुंबई : क्राईम ब्रँचमधील अधिकारी असल्याचे भासवून एका सायबर टोळीने सीवूड्स भागातील एका ज्येष्ठ नागरिकाला त्याच्या आधार कार्डचा चुकीची वस्तू खरेदी करण्यासाठी वापर झाल्याची भीती दाखवली. तसेच त्यांचे बँक खाती तपासण्याच्या बहाण्याने या ज्येष्ठ नागरिकाकडून तब्बल १२ लाख २१ हजारांची रक्कम उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. एनआरआय पोलिसांनी या प्रकरणातील सायबर टोळीविरोधात फसवणुकीसह आयटी अ‍ॅक्टनुसार गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील ७१ वर्षीय ज्येष्ठ नागरिक सीवूड्समध्ये राहण्यास असून गेल्या १० एप्रिल रोजी त्यांना अज्ञात सायबर टोळीतील एका सदस्याने फेडेक्समधून बोलत असल्याचे भासवून संपर्क साधला होता. तसेच अज्ञात व्यक्तीने त्यांच्या आधार कार्डचा चुकीची वस्तू खरेदी करण्यासाठी वापर केल्याचे सांगून त्यांना सायबर क्राईममध्ये तक्रार करण्यास सांगितले. यावर ज्येष्ठ नागरिकाने ऑनलाइन तक्रार करणार असल्याचे सांगितल्यानंतर सदर सायबर चोरट्याने त्यांचा कॉल क्राईम ब्रँचच्या अधिकाऱ्याशी जोडून देत असल्याचे भासवले. त्यांनतर दुसऱ्या सायबर चोरट्याने तो मुंबई क्राईम ब्रँचमधील डीसीपी प्रदीप सावंत असल्याचे भासवून त्यांच्या आधारकार्डचा गैरवापर करणाऱ्या मोहम्मद अली नामक व्यक्तीला पकडल्याचे सांगितले. तसेच त्यांच्याकडे त्याबाबत चौकशी करण्याकरिता स्काईप हे अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगितले.

त्यानुसार ज्येष्ठ नागरिकाने स्काईप डाऊनलोड केल्यानंतर सायबर गुन्हेगाराने स्काईपवरून महाराष्ट्र पोलिसांचे डीसीपी प्रदीप सावंत या नावाचे ओळखपत्र पाठवून ज्येष्ठ नागरिकाचा विश्वास संपादन केला. तसेच या प्रकरणात त्यांचा सहभाग असल्याच्या संशयावरून त्यांचे आर्थिक व्यवहार तपासण्यात येत असल्याचे सांगितले. त्यानंतर सायबर चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाकडून सहा महिन्यांचे बँक स्टेटमेंट व आधारकार्ड मागून घेऊन त्यांच्या एका खात्यातील रक्कम दुसऱ्या खात्यावर ट्रान्स्फर करण्यास सांगितले. तसेच त्यांना एफडी तोडण्यास सांगून ती रक्कमदेखील पाठवण्यास सांगितले. त्यानुसार ज्येष्ठ नागरिकाने १२ लाख २१ हजार रुपये ट्रान्सफर केल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे ज्येष्ठ नागरिकाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी एनआरआय पोलीस ठाण्यात धाव घेऊन याप्रकरणी तक्रार दाखल केली.

## रामेश्वरम कॅफे स्फोट प्रकरण : सूत्रधारासह दोघांना अटक

(पान १ वरून) माहिती मिळाल्यानंतर एनआयएने कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले. एनआयए, केंद्रीय गुप्तचर संस्था, पश्चिम बंगाल, तेलंगना, कर्नाटक आणि केरळ राज पोलिसांच्या समन्वयातून ही कारवाई करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यानंतर कोलकात्यातील एका न्यायालयात त्यांना सादर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने दोन्ही आरोपींना तीन दिवसांची ट्रान्झिट कोठडी सुनावली. एनआयएला पुढील चौकशीसाठी या आरोपींना बंगळुरूला घेऊन जाण्याची परवानगीदेखील न्यायालयाने यावेळी दिली.

कॅफेत स्फोट घडवून आणण्याची पूर्ण योजना ताहाने बनवली होती. ताहा हाच या स्फोटातील मास्टरमाइंड असल्याचा आरोप आहे. तर शाजीबने कॅफेत आयईडी स्फोटके ठेवली होती. बंगळुरूमधील ब्रूकफिल्डच्या आयटीपीएल रस्त्यावरील रामेश्वरम कॅफेत १ मार्च रोजी स्फोट झाला होता. यानंतर एनआयएने ३ मार्च रोजी या प्रकरणाचा तपास आपल्या हाती घेतला होता.

## वाढवण प्रकल्प राबवल्यास तुमच्या सत्तेवरच बुलडोझर

(पान १ वरून) यांनी केले. शिवसेनेचा दरारा काय आहे, हे त्यांनाच विचारा, जे इथून दिल्लीत फोन गेला की चळाचळा कापायचे. आता दिल्लीतून फोन आला की, मिंध्यांची दाढी चराचरा कापते, अशी टीका त्यांनी केली. पाच वर्षात येथील खासदाराने लोकसभेत कधी वाढवण बंदराचा विषय काढला का? आपल्याकडे मते मागायला हे मिंधे आले की त्यांना हे नक्की विचारा, असे आवाहनही उपस्थित जनसमुदायाला त्यांनी केले. पालघर जिल्हा वैशिष्टपूर्ण जिल्हा आहे, तिथे पर्यटन आणायला हवे होते. मात्र येथे असलेली पर्यटन स्थळे ते गाडून टाकायला निघाले आहेत. पालघरमध्ये पोर्ट नको एअरपोर्ट हवे आहे, असे सांगतानाच ते आम्ही आणू, असे आश्वासनही त्यांनी दिले. मोदींनी ते गुजरातचे नव्हे तर देशाचे पंतप्रधान असल्याचे लक्षात ठेवायला हवे, असे सांगतानाच त्यांना उद्देशून म्हणाले की, तुम्ही महाराष्ट्रातील चांगले प्रकल्प गुजरातला पळून नेले आणि महाराष्ट्रामध्ये विनाशकारी प्रकल्प ठेवले. हे चित्र बदलण्यासाठी पालघरच्या विकासासाठी, राज्याच्या, देशाच्या विकासासाठी ही निवडणूक आपल्याला जिंकायची आहे. तुम्ही आपले सरकार आणा, मी त्यांच्या कागदावरून वाढवण बंदराचा विषय पुसून टाकल्याशिवाय राहणार नाही, असे आश्वासनही त्यांनी शेवटी वाढवण बंदरवासीयांना दिले.

## पुन्हा युद्धाचे ढग दाटले!

(पान १ वरून) आमच्यावर हल्ला केल्यास सडेतोड प्रत्युत्तर देण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. इराण-इस्त्रायलमधील वाढता तणाव पाहता भारताने आपल्या नागरिकांसाठी खबरदारीचा इशारा दिला आहे. प्रादेशिक स्थिती पाहता भारतीयांसाठी सल्ला आहे की, त्यांनी पुढील सूचना मिळेपर्यंत इराण आणि इस्त्रायलला जाऊ नये. तसेच सद्यःस्थितीला या दोन देशांमध्ये असलेल्या भारतीयांनी तेथील दूतावासाशी संपर्क करावा आणि आपली नोंदणी करावी, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. अमेरिकेनेदेखील इस्त्रायलमधील आपल्या दूतावासातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना जेरुसलेम सोडून इतरत्र न जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावरून हल्ल्याची शक्यता प्रबळ असल्याचे मानले जात आहे.

## दुष्काळाची दाहकता वाढली

(पान १ वरून) पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यात गेल्या सहा वर्षांत पहिल्यांदाच एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात इतक्या मोठ्या संख्येने टँकर सुरू आहेत. गतवर्षी १२ एप्रिल रोजी राज्यात केवळ ७० गावे आणि २०४ वाड्या-वस्त्यांना ७५ टँकरकडून पाणीपुरवठा सुरू होता. म्हणजे गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी टँकरच्या संख्येत २८ पटीने वाढ झाली आहे.

कोकण विभागातील ७५ गावे आणि २७६ वाड्यांना ८४ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे, तर सर्वात कमी टँकर नागपूर विभागात सुरू आहेत. याविभागात केवळ दोन गावांना दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. एकंदरीत एप्रिल महिन्याच्या सुरुवातीसच राज्यात विक्रमी संख्येत टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. अद्याप निम्मा एप्रिल आणि संपूर्ण मे महिना बाकी आहे, त्यामुळे राज्यात येत्या काळात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती असून, टँकरच्या मागणीतही मोठी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बनावट सोशल मीडिया खाते : तरुणावर गुन्हा

■ मुंबई : व्यायाम प्रशिक्षक तरुणाचा इन्स्टाग्रामवरील फोटो चोरी करून त्याआधारे जीवनसाथी डॉट कॉम आणि इन्स्टाग्रामवर खाती तयार करत एका तरुणाने सोशल मीडियाच्या माध्यमातून मुलींसोबत जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार समोर आला आहे. या तरुणाविरोधात गुन्हा दाखल करून शिवाजी पार्क पोलीस अधिक तपास करीत आहेत.

दादर पश्चिमेकडील आर. के. वैद्य मार्ग परिसरात राहत असलेला ३१ वर्षीय सौरव (नाव बदललेले आहे) हा व्यायाम प्रशिक्षक आहे. त्याने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, १० एप्रिलला त्याच्या एका मैत्रिणीने कॉल केला. सौरवचा फोटो वापरून अमित शिंदे नावाने जीवनसाथी डॉट कॉम या विवाह जुळविणाऱ्या साईटवर बनावट खाते तयार करण्यात आले आहे. तो व्यक्ती सायनमधील एका मुलीसोबत चॅटिंग करून जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती तिने दिली. मैत्रिणीने दिलेली माहिती ऐकून सौरवला धक्का बसला. त्याने मैत्रिणीला सांगून सायनमधील त्या मुलीला परळमध्ये भेटायला बोलावले. तिने सौरवला त्या मुलाचा रेकॉर्ड केलेला व्हिडीओ कॉल दाखविला. सौरवने त्या मुलाला ओळखले. त्यांच्याच इमारतीत काही वर्षांपूर्वी राहत असलेला सागर कांदळकर हा तो तरुण होता. सागरने सौरवचा फोटो वापरून जीवनसाथी डॉट कॉम आणि इन्स्टाग्रामवर खाती तयार केली असल्याचे उघड झाले. अखेर सौरवने शिवाजी पार्क पोलीस ठाणे गाठून सागर विरोधात फोटोचा गैरवापर करून तोतयेगिरी करत फसवणूक केल्याची तक्रार

# नरेंद्र मोदींच्या भूमिकेनंतर चीनकडून सामोपचाराची भाषा

(पान १ वरून) मतभेद दूर करून द्विपक्षीय संबंधात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आम्ही सकारात्मकरीत्या वाटचाल करत राहू, असे माओ म्हणाल्या. पंतप्रधानांच्या मुलाखतीवर चीनकडून दोन दिवसांत दुसऱ्यांदा प्रतिक्रिया आली आहे. बळकट आणि स्थिर संबंध दोन्ही देशांचे हित जपतात आणि प्रादेशिक, जागतिक शांतता व विकासासाठी ते महत्त्वाचे असल्याचे माओ गुरुवारी म्हणाल्या होत्या. मोदींनी आपल्या मुलाखतीत चीनसोबतचे संबंध महत्त्वाचे असल्याचे सांगितले होते. मुत्सद्देगिरी आणि लष्करी पातळीवर द्विपक्षीय सहभागातून दोन्ही देश सीमेवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे मोदी म्हणाले होते. पूर्व लडाखच्या गलवान खोऱ्यात ५ मे २०२० रोजी चीनच्या आगळीकीमुळे तणाव निर्माण झाला होता. यामुळे दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले. हा तणाव दूर करण्यासाठी दोन्ही देशांनी आतापर्यंत लष्करी पातळीवर २१ वेळा चर्चा केली आहे. लष्करी आणि मुत्सद्देगिरीच्या पातळीवरील चर्चेनंतर गलवान खोरे, पँगाँग सरोवर, हॉट स्प्रिंग्स, गोगरा या ठिकाणांहून दोन्ही देशांनी सैन्य माघार घेतली आहे. मात्र, अद्यापही काही ठिकाणांवर दोन्ही देशांचे सैन्य एकमेकांसमोर उभे आहेत.

# मुंबईकरांचा प्रवास आणखी सुसाट!

(पान १ वरून) पालिकेच्या माध्यमातून १४ हजार कोटी खर्च करून कोस्टल रोडचे नियोजन करण्यात आले. वरळी ते मरिन ड्राइव्ह ही चार लेनची एक बाजू महिनाभरापूर्वी सुरू करण्यात आली. संपूर्ण प्रकल्प येत्या मे महिना अखेर सेवेत आणण्याचा प्रयत्न असणार आहे.

कोस्टल रोड प्रकल्पाच्या उत्तरेकडील बाजूने वांद्रे-वरळी सी लिंक जोडला जाणार आहे. त्यामुळे मुंबईकरांचा प्रवास सुस्साट होणार आहे. ४६ मीटर, ४४ मीटर आणि ६० मीटरचे तीन गर्डर याआधीच पुलाच्या बांधणीसाठी लाँच करण्यात आले आहेत. शुक्रवारी १२ एप्रिल रोजी न्हावा गावाच्या जेट्टीवर १२० मीटरच्या बो स्ट्रिंग पुलाची कमान बार्जमध्ये लोड करण्याचे काम सुरू केले. त्यानंतर आता वरळीच्या दिशेने ही बार्ज मार्गस्थ होईल. साधारण १५-१६ या तारखेपर्यंत वरळीपर्यंत पोहोचेल. त्यानंतर हवामानाच्या परिस्थितीनुसार, १६ किंवा १७ एप्रिलला हा गर्डर लाँच केला जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोस्टल रोडचे वरळीचे टोक आणि दक्षिणेकडील सी लिंक व उत्तरेकडील बाजूची कमान हे अंतर भरून काढण्यासाठी ८ गर्डर लाँच करण्यात आले आहेत. कोस्टल रोड पुलासाठी वापरला जाणारा धातू हा स्टीलचा असणार आहे. पुलाच्या एकूण गर्डरपैकी चार गर्डर याआधीच लाँच करण्यात आले आहेत. तर, दोन गर्डर न्हावा-शेवा बंदरावरती तयार असून, या महिन्यातच लाँच करण्यात येणार आहेत.

**निडो होम फायनान्स लिमिटेड**

(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) नोंदणीकृत कार्यालय : ५वा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०

**ई-लिलाव – संविधिक १५ दिवसांची विक्री सूचना**

प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्तांची पुनर्रचना आणि प्रतिभूत हित अंमलबजावणी कायदा, २००२ आणि प्रतिभूत हित (अंमलबजावणी) अधिनियम, २००२ अंतर्गत स्थावर ई-लिलावाद्वारे विक्री.

याद्वारे आम जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदारांना सूचना देण्यात येते की, खालील वर्णनाची मालमत्ता, खालील तक्त्यामध्ये नमूद अनुसार थकीत कर्जाच्या वसुलीपर्यंत खालील नमूद रकमेच्या वसुलीसाठी ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे'' आणि ''जी काही तेथे आहे'' आधारावर विक्री करण्यात येईल. सदर मालमत्ता – कर्जदार, सहकर्जदार आणि हमीदारांद्वारे कर्ज प्राप्त करण्यासाठी मेसर्स निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांच्याकडे तारण आहे. प्रतिभूत धनकोंनी खालील नमूद मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सहकर्जदार/हमीदारांची नावे | वसूल करण्याची रक्कम | राखीव किंमत आणि इरठे | लिलावाची तारीख व वेळ | निरीक्षणाची तारीख व वेळ | प्रतीकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अब्बास अहमद खान (कर्जदार) | १२/०४/२०२४ रोजी अनुसार कर्ज क्र. एलकेओएच०एचएल००००००७०५६५ अंतर्गत रु. ५२,३९,८४१.८०/- (रुपये बावन्न लाख एकोणचाळीस हजार आठशे एक्केचाळीस आणि ऐंशी पैसे मात्र) + त्यावरील पुढील व्याज+लिगल खर्च | रु. ४८,०१,६८०/- (रुपये अठ्ठेचाळीस लाख एक हजार सहाशे ऐंशी मात्र) इसारा रक्कम ठेव रु. ४,८०,१६८/- (रुपये चार लाख ऐंशी हजार एकशे अडुसष्ट मात्र) | ०७-०५-२०२४ स. ११ ते दु. १२ वा. दरम्यान (५ मिनिटांच्या स्वयंचलित विस्तारासह) | २३-०४-२०२४ स. ११.०० ते दु. ३.०० वा. दरम्यान | ०९-०१-२०२४ |
| प्रतिभूत मालमत्तेचे वर्णन : | सेक्टर-०९, फेज-१, तळोजा पंचानंद, तालुका पनवेल, जिल्हा रायगड-४१० २०८ येथे स्थित प्लॉट क्र. १५, १६, १७ आणि १८ वर बांधलेल्या ''पंचानंद हाइट्स'' म्हणून ज्ञात इमारतीमधील, डी विंगच्या दुसऱ्या मजल्यावरील सरासरी मोजमापित ४१.५३९ चौ. मीटर्स चटई क्षेत्रफळ+६.९४८ चौ. मीटर्स सी. बी+३.१७७ चौ. मीटर्स एफ. बी+७.२४३ चौ. मीटर्स टेरेस क्षेत्रफळाच्या फ्लॅट क्र. २०३ चे सर्व अंगीकृत भाग. | | | | | |
| २ | सुनील जे. गावडे (कर्जदार) समिधा सुनील गावडे (सहकर्जदार) | १२/०४/२०२४ रोजी अनुसार कर्ज क्र. एलकेवायएनएसटीएच००००००७१५०३ अंतर्गत रु. २५,२९,८१५.१५/- (रुपये पंचवीस लाख एकोणतीस हजार आठशे पंधरा आणि पंधरा पैसे मात्र)+त्यावरील पुढील व्याज+लिगल खर्च | रु. १६,९२,५७६/- (रुपये सोळा लाख ब्याण्णव हजार पाचशे शहात्तर मात्र) इसारा रक्कम ठेव रु. १,६९,२५७.६/- (रुपये एक लाख एकोणसत्तर हजार दोनशे सत्तावन आणि पैसे सहा मात्र) | ०७-०५-२०२४ स. ११ ते दु. १२ वा. दरम्यान (५ मिनिटांच्या स्वयंचलित विस्तारासह) | २९-०४-२०२४ स. ११.०० ते दु. ३.०० वा. दरम्यान | ०२-१२-२०२३ |
| प्रतिभूत मालमत्तेचे वर्णन : | नोंदणी जिल्हा ठाणे आणि उपजिल्हा उल्हासनगरच्या मर्यादेमध्ये आणि कुळगाव-बदलापूरच्या महापालिकेच्या हद्दीमध्ये, गाव वालिवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे स्थित आणि असलेल्या स. क्र. ६२ (भा.), मोजमापित १३८० चौ. मीटर्स, स. क्र. ६२ (भा.), मोजमापित १३८० चौ. मीटर्स, स. क्र. ७६, हि. क्र. ६/२/१, मोजमापित ३२० चौ. मीटर्स आणि स. क्र. ७६, हि. क्र. ६/१/२, मोजमापित २९० चौ. मीटर्स, एकूण मोजमापित ३३७० चौ. मीटर्स धारक एन. ए. प्लॉटवर बांधण्यात येणाऱ्या ''गणेश कॉम्प्लेक्स'' म्हणून ज्ञात इमारतीमधील मोजमापित चटई क्षेत्रफळ ४१.४८ चौ. मीटर्स असलेल्या (ज्यामध्ये बाल्कनी समाविष्ट आहे) ''बी'' विंगच्या पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १०३ चे सर्व अंगीकृत भाग. | | | | | |

टीप :- १) सदर लिलाव विक्री केवळ संकेतस्थळ https://sarfaesi.auctiontiger.net मार्फत संचलित करण्यात येईल आणि ज्या बोलीदारांकडे वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा आणि फोटो प्रूफ, पॅन कार्ड असेल आणि डिमांड ड्राफ्ट/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे योग्य पद्धतीने इरठे जमा केली असेल केवळ तेच या ''ऑनलाइन ई-लिलावामध्ये'' भाग घेण्यासाठी पात्र असतील.

२) इच्छुक बोलीदारांनी डिमांड ड्राफ्ट/आरटीजीएस/एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी :
**लाभधारकाचे नाव** : निडो होम फायनान्स लिमिटेड, **बँक :** स्टेट बँक ऑफ इंडिया, **खाते क्र.** – ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, **आयएफएससी कोड** : एसबीआयएन०००१५९३.

३) **इरठेसोबत ऑनलाइन अर्ज बोली प्रपत्र सादर करण्याची अंतिम तारीख ०६-०५-२०२४ आहे.**

४) **विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तींसाठी कृपया संकेतस्थळ** https://sarfaesi.auctiontiger.net **वर भेट द्या किंवा श्री. मौलिक श्रीमाळी यांना दू. +९१-६३५१८९६६४३/९१७३५२८७२७, हेल्पलाइन ई-मेल आयडी :** Support@auctiontiger.net वर संपर्क करा.

मोबाइल क्र. (श्री. श्रीकांत पाठारे ९७६८७४६६२४) (श्रीमती सुरेखा भणगे ९००४३५९८३५)
दिनांक : १३-०४-२०२४

हस्ता./- प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**सीएफएम अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**

CFM ARC thoughtful regeneration

नोंदणीकृत कार्यालय : ब्लॉक क्रमांक ए/१००३, वेस्ट गेट, वायएमसीए क्लबजवळ, एस. क्रमांक ८३५/१+३, एसजी महामार्ग, मकरबा, अहमदाबाद-३८० ०५१, CIN : U67100GJ2015PTC083994,
कॉर्पोरेट कार्यालय : पहिला मजला, वेकफील्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८.
ई-मेल : chetan.rajpurohit@cfmarc.in, संपर्क : ०७९-६६११८५५४ आणि ०७९-६६११८५५, मोबाइल : ९८९२८१६४७१

**परिशिष्ट-४-ए**
**(नियम ८(६) ची तरतूद पाहा)**
**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रूल ८ (६) च्या तरतुदींसह वाचित सिक्युरिटायजेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेट्स अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

**सीएफएम अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. ('सीएफएम-एआरसी')** (त्यांच्या क्षमतेमध्ये सीएफएमएआरसी ट्रस्ट-११२चे विश्वस्त म्हणून कार्यरत) यांनी ०९.०१.२०२३ दिनांकित नोंदणीकृत अभिहस्तांकन करारान्वये सदर कायद्याच्या सेक्शन ५ अंतर्गत **डेडलाइन अ‍ॅव्हर्टायझिंग प्रा. लि. आणि इतर (कर्जदार आणि सहकर्जदार)** ची तलस्थित प्रतिभूतीसह संपूर्ण थकीत कर्ज संपादित केले आहे आणि सदर अभिहस्तांकन कराराच्या आधारे, निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) यांनी तलस्थित प्रतिभूती आणि हमींसह सर्व अधिकार, हक्क आणि हित सीएफएम-एआरसीच्या नावे अभिहस्तांकित केले.

समस्त जनतेला आणि विशेषत्वाने कर्जदार आणि हमीदारांना सूचना देण्यात येते की, प्रतिभूत धनकोकडे तारण/प्रभाराधीन असलेली खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता (प्रतिभूत मालमत्ता), जिचा सीएफएम-एआरसीच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने १२.०१.२०२४ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे, ती **१. डेडलाइन अ‍ॅव्हर्टायझिंग प्रा. लि. आणि इतर (कर्जदार), २. प्रशांत शिना बसरूर (सहकर्जदार), ३. प्रवीण एस. बसरूर (सहकर्जदार), ४. प्रियदर्शनी एस. निंबाळकर (सहकर्जदार)** यांच्याकडून पुढील व्याज, अन्य मूल्य आणि वसुली झाले असेल तर ते वजा करून खर्च, प्रतिभूत धनकोला देय असलेल्यासोबत त्यासोबत **१६/०६/२०२२** रोजी अनुसार **रु. २,२७,१४,३४९.६९/-** (रुपये दोन कोटी सत्तावीस लाख चौदा हजार तीनशे एकोणपन्नास आणि पैसे एकोणसत्तर मात्र) च्या वसुलीसाठी **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे आणि जेथे जी आहे आधारावर'' व ''विनाअवलंब आधारावर'' २४ मे २०२४** रोजी विक्री करण्यात येईल.

| | |
|---|---|
| **प्रतिभूत मालमत्तेचे वर्णन :** | नोंदणी जिल्हा आणि उपजिल्हा ठाणेच्या मर्यादेमध्ये, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये महसूल गाव पाचपाखाडी, ठाणे, तालुका आणि जिल्हा ठाणे येथे स्थित प्राधिकरणाच्या मालमत्तेचा भाग असलेल्या प्लॉट क्र. सी-२, आरएससी-१७, १८ आणि १९, सर्व्हे क्र. १५३ वर निर्माणाधीन असलेल्या ''हॅपी हाइट्स'' नावाच्या प्रस्तावित इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील १२०५ चौ. फूट (बिल्टअप) टेरेस क्षेत्रफळ समाविष्ट मोजमापित ३९५ चौ. फूट आणि १८४० चौ. फूट क्षेत्रफळाच्या अनुक्रमे कमर्शियल प्रिमायसेस क्र. २०५ आणि २०६ चे सर्व अंगीकृत भाग. |
| **प्रतिभूत कर्ज :** | प्रतिभूत धनकोंना देय असलेली **१६/०६/२०२२** रोजी अनुसार रक्कम **रु. २,२७,१४,३४९.६९/- (रुपये दोन कोटी सत्तावीस लाख चौदा हजार तीनशे एकोणपन्नास आणि पैसे एकोणसत्तर मात्र)** पुढील व्याज, अन्य मूल्य आणि वसुली झाले असेल तर ते वजा करून खर्च, प्रतिभूत धनकोला देय असलेल्यासोबत त्यासोबत. |
| **राखीव किंमत (आरपी) :** | रु. २,६१,००,०००/- (रुपये दोन कोटी एकसष्ट लाख मात्र) |
| **इरठे :** | रु. २६,१०,०००/- (रुपये सव्वीस लाख दहा हजार मात्र) |
| **ई-लिलावाची तारीख, वेळ आणि स्थळ :** | ई-लिलाव/बोली संकेतस्थळाद्वारे (https://www.bankauctions.com) **दिनांक : २४.०५.२०२४ – वेळ स. ११.०० वा. ते दु. १२.०० वा. पर्यंत** |
| **निरीक्षण :** | प्राधिकृत अधिकाऱ्याच्या पूर्व सल्ल्याद्वारे |
| **बोली सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ :** | **२३.०५.२०२४ रोजी सायं. ५.०० वा.** किंवा तत्पूर्वी |
| **संपर्क :** | **डॉ. चेतन राजपुरोहित – ९८९२८१६४७१** ई-मेल – chetan.rajpurohit@cfmarc.in |

**काही भार असल्यास :** प्रतिभूत धनकोंना ज्ञात नाहीत.

ई-लिलावाद्वारे विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया ई-लिलावामध्ये भाग घेण्यासाठी बोली सादर करण्यापूर्वी प्रतिभूत धनकोंच्या संकेतस्थळ अर्थात https://www.cfmarc.in मध्ये दिलेली लिंक पाहा.

बोलीदारांनी संकेतस्थळ https://www.bankeauctions.com वर भेट देऊ शकतील किंवा सेवा प्रदाते मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना संपर्क करावा. बोलीदार साहाय्य क्र. : ०१२४-४३०२०२०/२१/२२, +९१ ७२९१९८११२४/११२५/११२६, ई-मेल : support@bankeauctions.com, **श्री. भाविक पांडे, संपर्क क्र. +९१ ८८६६६८२९३७**, maharashtra@c1india.com

ही ३० दिवसांची सूचना सरफेसी कायदा, २००२ अंतर्गत सरफेसी अधिनियमाच्या नियम ८, उपनियम ६ च्या अनुपालनामध्ये तुम्हाला सर्वांना देण्यात येत असून, निर्धारित लिलावाच्या पूर्वी त्यावरील देय आणि देययोग्य पुढील व्याज आणि अन्य मूल्यांसह उपरोक्त नमूद देय थकबाकी अदा करून, जर ते इच्छुक असतील तर मालमत्ता सोडविण्याच्या सल्ल्यासह उपरोक्त नमूद तारीख आणि वेळेला, उपरोक्त नमूद प्रतिभूत मालमत्तेच्या लिलाव/विक्री संचलनाच्या संबंधात कर्जदार आणि सर्व जामीनदार/गहाणकारांना कळविण्यात येत आहे. रक्कम अदा करण्यास कसूर केल्यास, कोणतीही किंवा सर्व मालमत्ता प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूत धनकोच्या स्वेच्छानिर्णयामध्ये प्रतिभूत हित (अंमलबजावणी) अधिनियम, २००२ च्या नियम ८ (५) अंतर्गत विहित कोणत्याही पद्धतीने विक्री करतील.

दिनांक : १३ एप्रिल २०२४
स्थळ : अहमदाबाद

हस्ता./- प्राधिकृत अधिकारी
सीएफएम अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
सीएफएमएआरसी ट्रस्ट-११२ चे विश्वस्त म्हणून कार्यरत